जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 JUL 2017

तरुण भारत

## आई व शिक्षक गुरुस्थानी

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यामध्ये 'जीवन गुरु' आणि 'शैक्षणिक गुरु' असे दोन प्रकारचे गुरू असतात. जीवनातील गुरु मी माझ्या आईला मानतो. आणि शैक्षणिक गुरु म्हणून मी माझा शैक्षणिक पाया भक्कम करणाऱ्या जि. प. शाळेतील शिक्षकांना मानत आहे.

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यामध्ये 'आई' हा प्रथम गुरु असतो. माझ्या कुलगुरूपदापर्यंतच्या प्रवासामध्ये आईचा फार मोठा वाटा आहे. आईने माझ्यावर चांगले संस्कार केले. मला शिक्षणाबाबत नेहमी प्रोत्साहान दिले, त्यामुळे आज कुलगुरु बनू शकलो. आयुष्याच्या वाटचालीमध्ये माझी आई व शिक्षक यांची भुमिका फार महत्वाची आहे. त्यामुळे माझ्या या गुरुंना गुरुपोर्णिमेनिमित्त वंदन करुन खूप खूप शुभेच्छा देतो.



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शिंदे आपल्या आईसमवेत.

– डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

9 JUL 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आईच माझी जीवनगुरू



प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात दोन प्रकारचे गुरू असतात. एक म्हणजे जीवनातील गुरू आणि दुसरे म्हणजे शैक्षणिक जीवनातील गुरू. जीवनातील गुरू हा आपल्याला पारंपरिक शिक्षणाच्या पलीकडले शिक्षण देत असतो. त्याच्या शिकवणुकीतून आपल्याला जीवनाचे तत्त्वज्ञानच जणू अवगत होत असते. माझ्या आयुष्यात हे जीवनगुरुचे स्थान माझ्या आईलाच आहे. तिच्यामुळेच माझ्या आयुष्याच्या नौकेला योग्य दिशा लाभली.

शैक्षणिक गुरू हे आपल्याला योग्य शिक्षण देऊन त्या शिक्षणाचे योग्य प्रकारे उपयोजन करण्याचे ज्ञान प्राप्त करवून देण्यासाठी झटत असतात. माझ्या आयुष्यात आईनंतर शिक्षणाचे महत्त्व माझ्या मनावर बिंबवले ते माझ्या जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी. त्यामुळे माझ्या जिल्हा परिषदेतील शिक्षकांचे माझ्या जडणघडणीत मोलाचे योगदान आहे, हे मला आवर्जून नमूद करायचे आहे. एका सर्वसामान्य परिस्थितीतून आलेल्या विद्यार्थ्यामध्ये पुढे शिवाजी विद्यापीठासारख्या एका देशातील अग्रगण्य विद्यापीठाचा कुलगुरू होण्यापर्यंतची पात्रता निर्माण करण्याचे श्रेय माझ्या जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षकांनाच जाते. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने मी माझे जीवनगुरू आणि शैक्षणिक गुरू या दोघांनाही विनम्रभावे वंदन करतो.

– कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 JUL 2017

सकाळ

## एनएसएसचा राज्य पुरस्कार अमृता भंडारे यांना जाहीर



कोल्हापूर, ता. ८ : येथील शिवाजी विद्यापीठातील प्राणिशास्त्र अधिविभागाची विद्यार्थिनी अमृता अनिल भंडारे यांना राष्ट्रीय सेवा योजनेचा राज्यस्तरीय उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार जाहीर झाला. केंद्र व राज्य सरकारतर्फे राष्ट्रीय सेवा योजनेत उत्कृष्ट काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी गौरवण्यात येते. पुरस्कारसाठी राज्यभरातील विद्यापीठातून आलेल्या प्रस्तावातून निवड केली जाते. अमृता यांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा. डॉ. डी. के. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठ प्रतिनिधी संग्राम मोरे, सुजित मुंडे यांचे मार्गदर्शन लाभले.